महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक / नाविमं / पमा / 1692
दिनांक : 04 / 06 / 2024

प्रति,

मुख्यध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
भंडारा / चंद्रपूर / नागपूर शहर / नागपूर ग्रामिण / वर्धा / गडचिरोली / गोंदिया,

**विषयः– मार्च 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.**

संदर्भः– राज्य मंडळ पत्र क.रा.मं. / परीक्षा–2 / 2201 दि. 04 / 06 / 2024.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा मार्च 2024 चा निकाल दि. 27 / 05 / 2024 रोजी मंडळामार्फत ऑनलाईन जाहिर करण्यात आला आहे. **सदर निकालाच्या मुळ गुणपत्रिका व शालेय अभिलेख मंडळामार्फत मंगळवार दि. 11 / 06 / 2024 रोजी सकाळी 11.00 वाजता खालील जिल्हा वितरण केंद्रावरुन वाटप करण्यात येणार असून त्याच दिवशी दु. 3.00 नंतर विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.**

तरी उपरोक्त दिवशी आपण अथवा आपले प्रतिनिधीस शाळेचे अधिकारपत्रासह निकालाचे साहित्य स्विकारण्याकरीता पाठविण्यात यावे.

| अ.क. | जिल्हा | जिल्हा वितरण केंद्राचे नांव |
|---|---|---|
| 01 | भंडारा | लालबहादूर शास्त्री हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा. |
| 02 | साकोली | नंदलाल पाटिल कापगते विद्यालय, साकोली. जि. भंडारा. |
| 03 | चंद्रपूर | हिंदी सिटी हायस्कूल आझाद गार्डन जवळ, चंद्रपूर. |
| 04 | नागभिड | जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,नागभिड. जि. चंद्रपूर. |
| 05 | वर्धा | न्यु.इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा. |
| 06 | गडचिरोली | श्री.शिवाजी हायस्कूल व क. महा. गोकूल नगर जि. गडचिरोली. |
| 07 | आलापल्ली | धर्मराव विद्यालय आलापल्ली जि. गडचिरोली. |
| 08 | आरमोरी | हितकारणी विद्यालय आरमोरी जि. गडचिरोली. |
| 09 | गोंदिया | गुजराथी नॅशनल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया. |
| 10 | नागपूर शहर | नागपूर विभागीय शिक्षण मंडळ कार्यालय,नागपूर. |
| 11 | नागपूर ग्रामिण | नागपूर विभागीय शिक्षण मंडळ कार्यालय,नागपूर. |

**टिप** :– माध्यमिक शालांत गुणपत्रिकेत काही त्रृटया असल्यास (जसे नावात तफावत, मिसप्रिंट, लोगो नसणे, स्वाक्षरी नसणे, इतर शाळेची गुणपत्रिका असल्यास व सदोष गुणपत्रिका इ. असल्यास) अशा गुणपत्रिका हस्तपोच संकलन केन्द्रावर अथवा मंडळ कार्यालयास तात्काळ सादर कराव्यात.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रतिलिपि–

1) मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,पुणे.
1)शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, नागपूर / चंद्रपूर / भंडारा / गोंदिया / वर्धा / गडचिरोली.
2) प्राचार्य, / मुख्याध्यापक,सर्व वितरण केंद्र, यांनी उपरोक्त दिनांकास निकाल वाटपाबाबत योग्य व्यवस्था उपलब्ध करण्यात यावी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/1693
नागपूर, दिनांक – ०४/०६/२०२४

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

विषयः– मार्च 2024 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.

संदर्भः– राज्य मंडळाचे पत्र व प्रकटन क. रा.मं./परीक्षा–२/२२०१, दि.–०४/०६/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मंडळामार्फत मार्च 2024 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

तरी सदर प्रकटनास आपण आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृत्तपत्रातून तात्काळ, विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०२४ च्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.**

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर दिनांक २७/०५/२०२४ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने मार्च २०२४ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना **मंगळवार दिनांक ११/०६/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून माध्यमिक शाळांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना सूचित करण्यात आलेले आहे.

याबाबत विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित मुख्याध्यापक/विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- ०४/०६/२०२४